# ४९. सासू सूनेची गोष्ट

काय मित्रांनो ? चक्रावलात ? सध्या दूरदर्शनवर याच विषयावरचा एक कार्यक्रम चालू आहे त्यासारखाच हा प्रकार आहे का ? अशी शंका आली ? नाही अजिबात नाही.

तुम्हाला माहितीच आहे की मी समुपदेशकाची भूमिका वेळोवेळी वठवित असतो. एक दिवशी एक सासू सूनेसंबंधी तक्रार सांगू लागली. मी शांतपणे सर्व ऐकून घेतले आणि मग सासूला समजवण्याचा प्रयत्न केला की आपण हल्लीच्या पिढीकडून कसलीही अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही. आपल्याला पाण्यावरच्या तेलाच्या थेंबासारखे जगता आले पाहिजे. तशी सवय नसेल तर करावी लागेल.आजच्या काळाची ती एक गरज आहे. वगैरे वगैरे. सासू थोडीफार शांत झाली व माझा निरोप घेऊन परतली.

खरेतर सासूची अपेक्षा रास्तच होती पण प्रत्येक समस्येला दुसरीसुद्धा बाजू असतेच. दुस-या दिवशी सून माझ्याकडे आली व तीने आदल्या दिवशी घडलेला प्रसंग सांगितला व तीने सासूची अपेक्षा का पूरी केली नाही ते सांगितले. तीची बाजू सुद्धा तेवढीच बरोबर होती. खरेतर ह्या सासू-सुनेचा संघर्ष मी गेले २२ वर्षे बघत आहे त्यामुळे दोघीही एकमेकांशी अशा का वागतात हे खरेतर मला ज्ञात आहे. पण माझ्याशी बोलल्यावर दोघींनाही बरे वाटते म्हणून मी शांतपणे प्रेक्षकाची भूमिका बजावतो.

मी जेव्हा ह्या सुनेच्या वागण्याचा विचार करू लागलो तेव्हा मला आढळले कि माझ्या पहाण्यात अश्या कितीतरी सूना आहेत त्यांचे वागणे जर ह्या सासूला कळले तर तीला आपली सून गुणांची पुतळीच वाटायला लागेल आणि म्हणूनच ह्या लेखात सुनांचे विचित्र वागणे शब्दात पकडण्याचा प्रयत्न केला आहे.
ह्या सर्व सूना माझ्या परिचयाच्या आहेत.

<u>सून नंबर १ ः</u>
एक चौकोनी कुटूंब असते. आई वडिल मुलगी व मुलगा. आई निगुतीने संसार करते, नव-याचे आजारपण सांभाळते, मुलांवर चांगले संस्कार करते. मुलांचे लग्न होते. काही वर्षांनी मुलाचेपण लग्न होते. त्याच्या मनासारखी बायको त्याला मिळते. मुलाला शिक्षणाच्या मानाने चांगली नोकरी मिळते व तो आपल्या कर्तबगारीने उच्च पदावर पोचतो. घरात श्रीमंती पाणी भरू लागते. मोठा फ्लॅट, गाडी, नोकर वगैरे. त्याची बायको नोकरी सोडते. त्याला एक मुलगा होतो.

पुढे त्या बाईचा (सासूचा) नवरा देवाघरी जातो. ती सासू घर विकून मुलाच्या आश्रयाला येते व तीचा तुरुंगवास सुरू होतो.सासूला गुडघेदुखीचा त्रास असतो. हा मुलगा सकाळी लवकर कामावर जाई व रात्री खूप उशीरा घरी येई. आईची विचारपूस करण्यासाठी त्याच्याकडे वेळ नाही व इच्छाशक्ती पण नाही.

फ्लॅट मोठा असल्यामुळे सासूला एक खोली दिलेली आहे. त्या सासूने त्या खोलीच्या बाहेर पडायला बंदी आहे. तीला वेळच्यावेळी जेवण चहा त्या खोलीतच दिला जातो. फोन केला तर पहारा ठेवायला नोकर आहे. कोणाला फोन केला, काय बोलली ही खबर लगेच सूनेला समजते. नातवाला खोलीत जायची बंदी आहे. अधेमधे त्या सासूची मुलगी आईला आपल्या घरी घेऊन जाते. औषध पाणी बघते. एवढाच काय तो विरंगुळा. भावाला विचारावे तर आईची जबाबदारी घ्यावी लागेल म्हणून मुलगी काही करू शकत नाही.

ह्या सासूचा जन्म स्वयंपाक घरात गेलेला. नवीन पदार्थ करायची व लोकांना खायला घालायची हौस. पण ईलाज नाही. स्वयंपाकघरात ही प्रवेश नाही. मुलाला सूनेला, नातवाला एखादा पदार्थ करून खाऊ घालायचे सुखही नाही. अशी ही एक बंदिवान सासूची कहाणी. ह्या सूनेची सून अशीच वागली तर ह्या सूनेला आपली चूक कळेल ?

<u>सून नंबर २ ः</u>

एक मोठे कुटूंब असते. आई वडिल मुलगा, २ मुली व वडिलांची आई.

बाईला सासूकडून बोलणी खावी लागतात. अर्थात ही बाई संसाराच्या जवळ जवळ सगळयाच डिपार्टमेंटमध्ये नापास असते. वडिल पोलीस दलात अधिकारी असतात. त्यांना ह्या सासवा सुनांच्या झगडयामध्ये पडायला वेळच नसतो. घराबाहेरच्या **Law & Order** सांभाळण्यात सर्व शक्ती जात असते. कालांतराने दोन्ही मुलींची लग्ने होतात. मुलगा प्रेमविवाह करतो. त्याची बायको इतर जातीची असते . पण नाकी डोळी नीटस व तरतरीत असते. त्या सूनेला आई नसते. ह्या मुलाच्या बायकोचे (सूनेचे) सासूबरोबर पटत नाही. कसे पटणार ? ही सासू तर सगळीकडे नापासच असते. काय बोलायचे भान नाही. वाचनात गति नाही. असो.

सून कर्तबगार असते. संपूर्ण घराचा ताबा घेते. आजे सासू (मूलाची आजी) मात्र नातसूनेच्या कर्तबगारीवर खूष असते. सून घरचे सांभाळून नोकरी करते. शेवटी ती तोडगा काढते. ती सून त्या सासूबरोबर एकही शब्द बोलत नाही. जेवण खाण व इतर कर्तव्यात चुकत नाही. ही सून आपल्या आईशी कशी वागते म्हणून दोन्ही मुली त्या सूनेवर खार खातात, त्यामुळे त्या मुलींच्या कोणत्याही समारंभात ही सून जात नाही.

त्या सूनेचे काही चुकते आहे असे मला वाटत नाही. तीने निवडलेला मार्ग योग्यच आहे. हो मी ठामपणे म्हणू शकतो कारण ह्या सासूला मी चांगलाच ओळखतो. नुकतीच ह्या सासूला देवाज्ञा झाली.

<u>सून नंबर ३ ः</u>

वरील कुटुंबातील मोठया मुलीचे लग्न होते. तीचा नवरा कर्तबगार, हुशार असतो व बॅकेत अधिकारी म्हणून काम करत असतो. लग्नाच्या वेळी ही मुलगी फक्त २० वर्षाची असते. ही मुलगी आपल्या आईच्याच वळणावर गेलेली असते. साधा चहा तिला करता येत असतो का कुकरचे झाकण लावता येत नसते. पण तीचा चेह-यावरचा रूबाब बघून घ्यावा. ह्या मुलीची सासू तीला सांभाळून घेते. घरची सर्व जबाबदारी ही सासू सांभाळते. दोन नातवंडांना मोठे करते. सुनेची नोकरी चालू राहते.

खूप वर्षांनी ह्या सासूच्या दुसऱ्या सूनेला दिवस रहातात व सासू त्या सूनेकडे रहावयास जाते.
मधल्या सूनेची मुलेपण मोठी होतात. आई आळीपाळीने सर्व मुलांकडे ३ – ४ महिने या प्रमाणे येजा करते. म्हातारपण सूरू होते. काही ना काही कारण काढून मोठी सून सासूला घरी नेण्याचे टाळते. इतकेच काय मरणसमयी वेळेवर कळवून ही परदेशातून तीला भेटायला येत नाही. खरेतर आई मोठया मुलांच्या नावाचा जप करत असते पण मुलगा व सून भेटण्याचे नशीब नसते व तीला देवाज्ञा होते.

थोडक्यात जो पर्यंत सासू घरातील सर्व कामे, जेवणखाण, मुलांवर संस्कार, नोकरांवर देखरेख करत होती, तोपर्यंत सुनेला सासूची अडचण होत नव्हती. पण मग म्हातारपणी जेव्हा सासूची सेवा करायची वेळ आली तेव्हा तीने जबाबदारी टाळली.

त्याच सुनेच्या मुलीचे, तीच्या सासूबरोबर पटत नाही. जावयाला तर विकतच घेतला आहे . साधे नातवंडांना भेटायला दिले जात नाही अशी ही तऱ्हा.
मित्रांनो तुमच्या माहितीच्या विचित्र सुनांबद्दल कळवाल. **Bye**! काय म्हणालात ? कोठे निघालात ? अहो त्या सासूला लेख वाचायला देतो.